**क्र. ३७४(२) / स्थापत्य / २०१८ / १४-ब** **दिनांक - २४ जून, २०१९**

महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा- २०१८

**जाहिरात क्र. ४६/२०१८**

**घोषणा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक २५ नोव्हेंबर, २०१८ रोजी घेण्यात आलेल्या **महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा- २०१८** च्या लेखी परीक्षेचा निकाल **दिनांक २२ मार्च, २०१९** रोजी जाहीर करण्यात आला असून मुख्य परीक्षेद्वारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांकडून प्रस्तुत परीक्षेच्या अधिसूचनेत अधिसूचित केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम (Preference) त्यांच्या प्रोफाईलमध्ये पाठविलेल्या नमुन्यात (Format) Online पध्दतीने मागविण्यात आले होते. तद्नंतर महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा - २०१७ चा अंतिम निकाल दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी जाहीर करण्यात आला. सदर अंतिम निकालानुसार शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांनी महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा - २०१८ करीता त्याच पदांना पसंतीक्रम दिलेला असल्यास व पुन्हा त्यांचीच शिफारस झाल्यास सन २०१८ च्या परीक्षेतील पदे रिक्त रहाण्याची शक्यता आहे. त्यामुळे सन-२०१८ च्या परीक्षेमधील उमेदवारांना संधी उपलब्ध होणार नाही. सदर बाब विचारात घेऊन प्रस्तुत महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा - २०१८ मधून मुलाखतीस अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांसाठी पदांचे पसंतीक्रम Online पध्दतीने भरुन देण्याची पुन्हा संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यानुसार महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा - २०१८ व्दारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेच्या अधिसूचनेत अधिसूचित केलेल्या पदांसाठीचा पसंतीक्रम (Preference Number) त्यांच्या Profile मध्ये पाठविलेल्या नमुन्यात (Format) आयोगास Online पध्दतीने Link Open झाल्यापासून आठ दिवसांच्या आत पाठविणे अनिवार्य राहील. केवळ ऑनलाईन पध्दतीने भरलेले पसंतीक्रम विचारात घेण्यात येतील. अन्यथा अधिसूचनेत ज्या क्रमाने शासनाचे विभाग दर्शविले आहेत, त्याप्रमाणे प्रथम गट-अ ची पदे व तद्नंतर गट-ब ची पदे अशा पध्दतीने पदांचा पसंतीक्रम गृहित धरला जाईल. अन्य कोणत्याही प्रकारे पाठविलेला पसंतीक्रम ग्राह्य धरला जाणार नाही व तद्नंतर याबाबत कोणतीही निवेदने/ पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही. तसेच **यापूर्वी प्रस्तुत मुख्य परीक्षेचा निकाल घोषित झाल्यानंतर उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने पाठविलेले पदांचे पसंतीक्रम रद्दबातल ठरतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

मुख्य परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

**दिनांक:२४ जून, २०१९**
**ठिकाण: मुंबई**

**उप सचिव (परीक्षा-१)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**